## डील विभागामध्ये प्रवेशित पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या परिक्षार्थी व पुर्नपरीक्षार्थी (Repeater) विद्यार्थ्यांसाठी परीक्षेसंदर्भात सूचना - 2022

- डील विभागाद्वारे पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांतर्गत ज्या विद्यार्थ्यांनी प्रवेश घेतल्यापासून परीक्षा दिलेली नाही किंवा जे पुर्नपरीक्षार्थी आहेत त्यांना सुचित करण्यात येते की, **15 जून 2022 ते 30 जून 2022 दरम्यान** अंतिम लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले.
- दि. 28 मार्च 2022 पासून 15 एप्रिल 2022 पर्यंत विद्यार्थ्यांसाठी परीक्षा अर्ज उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.
- परीक्षा व मूल्यमापन विभागाद्वारे प्राप्त निर्देशानुसार ऑफलाईन (Offline) पध्दतीने बहुपर्यायी (MCQ) होणार आहे. परीक्षेचे पुढीलप्रमाणे स्वरूप असणार आहे.

| एकूण प्रश्न | वेळ | गुण | एकूण गुण |
|---|---|---|---|
| 50 | दोन तास (120 मिनिटे) | प्रती प्रश्न 2 गुण | 100 गुण |
| **सर्व 50 प्रश्न सोडवणे अनिवार्यच आहे** | | | |

- परीक्षेसाठी जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्हयात प्रत्येकी एक परिक्षा केंद्र असणार आहे. परीक्षा केंद्राची नावे आपले जेव्हा Hall Ticket येतील तेव्हा आपणास समजणार आहेत.
- परीक्षा अर्ज www.nmu.ac.in या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेले आहेत. वरील संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या DEEL (External Mode) या लिंकवर क्लिक करावे त्यानंतर येणाऱ्या पेजवरील डाव्या बाजूस असलेल्या **May 2022 Examination** या लिंकवर क्लिक करावे.
- सदर लिंकवर क्लिक केल्यावर पीडीएफ (PDF) फाईल ओपन होईल त्यानंतर (Ctrl+F) ही कमांड वापरून आपल्या नावाचा परीक्षा अर्ज शोधून त्याचीच प्रिंट काढावी.
- **पदवी व पदव्युत्तर शिक्षणक्रमांच्या** अंतर्गत जे विद्यार्थी प्रथम वर्षास प्रवेशित आणि द्वितीय वर्षातील प्रवेशित असे विद्यार्थी मागील कोणताही विषय अनुत्तीर्ण (Fail) नाहीत अशा विद्यार्थ्यांनी परीक्षेचे अर्ज **पाठवायचे नाहीत**. मात्र जे **पुर्नपरीक्षार्थी** (Repeater) विद्यार्थी आहेत त्यांनीच फक्त परीक्षा अर्ज आणि शुल्क भरल्याचे चलन व गुणपत्रकाची Xerox प्रत सोबत जोडून 15 **एप्रिल** 2022 च्या आत डील विभागात पोस्टाने पाठवायचे किंवा वैयक्तिक येवून डील विभागात जमा करायचे आहेत.
- ज्या विद्यार्थ्यांचे प्रथम, द्वितीय किंवा तृतीय वर्षाचे काही विषय बाकी असतील (Repeater) अशा विद्यार्थ्यांनी (प्रथम व द्वितीय वर्षातील प्रत्येक वर्षासाठी वेगवेगळे फी चलन भरावे लागेल. उदा. एम. ए. इतिहास प्रथम वर्षाचा एक पेपर व द्वितीय वर्षाचे दोन पेपर बाकी असतील तर प्रथम वर्षाचे एक चलन व द्वितीय वर्षाचे एक चलन असे दोन (2) चलन वेगवेगळे भरावे लागतील.

स्वतंत्र वेगवेगळे चलन काढून ते सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या जळगाव, धुळे, नंदूरबार या जिल्हयातील नजीकच्या शाखेत भरावयाचे आहेत.

- कोणत्याही सबबीवर परीक्षा अर्ज भरल्याशिवाय परीक्षेस बसता येणार नाही याची नोंद घ्यावी.
- सदर अर्ज भरण्याची अंतिम मुदत 15 **एप्रिल** 2022 ही असून पुर्नपरीक्षार्थी विद्यार्थ्यांनी भरलेला परीक्षा अर्ज व त्यासोबत बँकेत भरलेल्य चलनाची Finance / DEEL या नावाच्या चलनाची प्रत व मागील वर्षाच्या गुणपत्रकाची झेरॉक्स जोडून खालील पत्त्यावर स्पिड/रजिस्टर पोस्टाद्वारे किंवा वैयक्तिक येवून सदर तारखेच्या आत पाठवावेत.
- ज्या विद्यार्थ्यांनी परीक्षा अर्जावर परीक्षा केंद्राचा जिल्हा टाकला नाही त्या विद्यार्थ्यांना विद्यापीठ जे परीक्षा केंद्र देईल त्याच केंद्रावर विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागेल याची नोंद घ्यावी.
- परीक्षा अर्जावरील आपले नाव, आईचे नाव, विषय तपासून बरोबर असल्याची खात्री करावी.
- काही बदल असेल तर डील विभागाच्या 0257-2257495 / 0257-2258496 या दूरध्वनी क्रमांकावर लगेच संपर्क साधावा.
- परीक्षेचे वेळापत्रक लवकरच विद्यापीठाच्या संकेत स्थळावर उपलब्ध करून देण्यात येईल व त्यानुसार परीक्षेच्या किमान 8 ते 10 दिवस अगोदर हॉल टिकीट संकेत स्थळावरच उपलब्ध करून देण्यात येईल.

## ❖ महत्वाच्या सूचना :

- जुलै-ऑगस्ट 2015 मध्ये डीलच्या वेबसाईटवरील नोटीस बोर्डावर सूचना टाकलेली होती की, ज्या विद्यार्थ्यांना डील विभागाद्वारे गुणपत्रक मिळाले आहे. त्यावर डिस्टन्स मोड असा उल्लेख आहे परंतू दि. 16 एप्रिल 2015 रोजी झालेल्या विद्या परिषद ठराव क्र. वि.प.ए.-48/2015 नुसार Distance Education ऐवजी External Mode असलेले सुधारित गुणपत्रक छपाई करण्यात आलेली आहेत. सदर निर्णयानुसार विद्यार्थ्यांनी जर गुणपत्रक बदलवून नेलेली नसतील त्यांनी परीक्षे अगोदर सदरची जुनी गुणपत्रके डील विभागात जमा करून त्याऐवजी नवीन बदलेली गुणपत्रके घेऊन जावीत.
- परीक्षा अर्ज सादर करण्याची अंतिम तारीख दिलेली आहे. त्यानंतर आलेले परीक्षा अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी व त्यास संबंधित विद्यार्थीच जबाबदार राहील.
- ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप प्रवेश घेते वेळी पात्रते संदर्भात आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केली नाही त्यांचे येण्यास अडचण येणार आहे. जर आपणास परीक्षेला बसता आले नाही तर संबंधित विद्यार्थी त्यास जबाबदार राहील याची नोंद घ्यावी.
- वेळोवेळी संकेत स्थळावर तसेच आपल्या विषयनिहाय केलल्या WhatsApp Group वर माहिती प्रसिध्द केलेली असते त्यामुळे विद्यार्थ्यांनी वारंवार संकेत स्थळास भेट द्यावी व जर काही बदल झाले असतील तर ते समजून घेणे ही विद्यार्थ्यांची जबाबदारी राहील याची नोंद घ्यावी.

**परीक्षा अर्ज पाठविण्याचा पत्ता**

**मा. संचालक**

**बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग**

Department of External Education & Learning (DEEL),

**डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम विद्यार्थी भवन, रिक्षा स्टॉप जवळ, कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव, पिनकोड-425001**

**संपर्कासाठी : दूरध्वनी क्र. 0257-2257495 / 0257-2258496**

**संकेत स्थळ (Website) :** www.nmu.ac.in संकेत स्थळावर गेल्यानंतर डाव्या बाजूस असलेल्या DEEL (External Mode) लिंक

**सदर अंतिम लेखी परीक्षेसाठी डील विभागाद्वारे शुभेच्छा !**

प्रा. अं. बा. चौधरी
संचालक,
बहि:स्थ शिक्षण आणि अध्ययन विभाग (DEEL)